नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - ८० Issue - 80 | वार - गुरुवार दि. १३ ऑगस्ट २०२६ Blow- Thursday Date 13 AUGUST 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## पेपरफूट गैरप्रकारबाबत केंद्राचा कायदा राज्यात लागू

### परीक्षा पद्धती सुधारणांसाठी उच्चस्तरीय समिती; मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात विविध सेवाभरतींसाठी होणार्या परीक्षा पद्धतीत सर्वसमावेशक, अधिक सुरक्षित आणि सर्वसंमतीने सुधारणांसाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज घेतला. या समितीने राज्यात प्रत्येक विभागात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत सर्वंकष सुधारणांबाबत अहवाल सादर करायचा आहे. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सुद्धा उपस्थित होते, त्यांनीही अनेक उपयुक्त सूचना या बैठकीत केल्या. राज्यात गेल्या काही वर्षात सातत्याने होत असलेल्या पेपरफुटी, आणि महत्वाच्या परीक्षांमधील घोळांच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला.



वर्षा निवासस्थानी आज विशेषत्वाने आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे निर्देश दिले. ही उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेत राहणार असून राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा त्यात समावेश असेल. या समितीने प्रत्येक महसुली विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षण संस्थाचालक आणि संबंधित घटकांशी चर्चा करून त्यांची मते जाणून घ्यायची आहेत. त्याआधारावर राज्यासाठीचे समग्र धोरण ठरेल.

अलिकडेच केंद्र सरकारने पेपरफूट आणि परीक्षा गैरव्यवहारासंदर्भात संसदेत एक कायदा केला आहे. महाराष्ट्राचाही स्वतंत्र कायदा आहेच. तथापि संसदेने केलेला कायदा अधिक कठोर असल्याने तो महाराष्ट्रातही लागू करण्यासंदर्भात येणार्या पंधरवड्यात प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

राज्यात किमान २५ हजार सुरक्षित क्लासरुम उभारण्यात याव्यात, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत दिले. या विविध परीक्षांमध्ये जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांचीही समन्वय भूमिका, इतर विविध देशांमधील परीक्षा पद्धती, विद्यमान प्रक्रिया आणि त्यातील विविध संभाव्य सुधारणा अशा अनेक विषयांवर यावेळी सांगोपांग चर्चा झाली. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

## महाराष्ट्रातील विविध भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात श्रावणाचं आगमन धो धो पावसानं होणार आहे. महाराष्ट्रातील विविध भागांत गुरुवार १३ ते शनिवार १५ ऑगस्ट २०२६ दरम्यान मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्राचा घाट परिसर आणि उत्तर कोकणात जोरदार पावसाची शक्यता आहे. राज्याच्या काही भागांत अतिवृष्टीची शक्यता आहे.

मध्य महाराष्ट्रातील घाट परिसर आणि उत्तर कोकणात तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. तसेच दक्षिण कोकण आणि गोव्यात निवडक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

मुंबईत आकाश ढगाळ राहण्याची आणि मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. मुंबईच्या काही भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान ३१ तर किमान तापमान २५ अंश सेल्सिअस राहील, असा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे.

कोकणात आणि मध्य महाराष्ट्रात गुरुवारी अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची आणि तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पडेल आणि निवडक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल,असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी ढगांच्या गडगडाटासह विजांच्या कडकडाटात पावसाची शक्यता आहे. पुण्यात आकाश ढगाळ राहण्याची आणि हलक्या सरींची शक्यता आहे.

## 'सीजेपी'च्या समर्थनार्थ काढलेल्या मोर्चातील आंदोलकांवरील गुन्हे मागे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांच्या आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांवर दाखल झालेले खटले मागे घेण्याच्या धोरणात राज्य शासनाने महत्त्वपूर्ण सुधारणा केली आहे. या नव्या निर्णयानुसार, विविध राजकीय व सामाजिक आंदोलनांमधील ज्या गुन्ह्यांमध्ये ३१ मार्च २०२७ पर्यंत दोषारोपपत्रे (चार्जशीट्स) दाखल होतील, ते सर्व खटले कायदेशीर तरतुदींनुसार मागे घेतले जाणार आहेत. गृह विभागाने बुधवारी यासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) जारी केला आहे.

यापूर्वी शासनाने २१ जुलै २०२६ रोजी काढलेल्या जीआरनुसार, ३१ जुलै २०२६ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झालेले खटलेच मागे घेण्यास मंजुरी होती. मात्र, न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्यांची संख्या लक्षात घेता, ही मुदत वाढवण्याची मागणी होत होती. अखेर शासनाने ही मुदत दीड वर्षांनी वाढवून ३१ मार्च २०२७ पर्यंत केली आहे.

या सुधारित निर्णयामुळे हजारो राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेष म्हणजे, दिल्लीतील जंतर-मंतर येथील विद्यार्थी आंदोलनाच्या समर्थनार्थ महाराष्ट्रात काढण्यात आलेल्या मोर्चांमधील तरुण आणि विद्यार्थ्यांचाही यात समावेश आहे.

त्या आंदोलनादरम्यान दाखल झालेल्या गुन्ह्यांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक भविष्य धोक्यात येऊ नये, हा संवेदनशील दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून हे खटले मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील हजारो आंदोलक तरुण, विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांवरील कायदेशीर तणाव दूर होणार आहे.

## सातबारावर नाव नसलेले शेतकरी आता शासकीय रेकॉर्डवर येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील ज्या शेतकऱ्यांची नावे सातबारा उताऱ्यावर नाहीत किंवा इतर अधिकारात ज्यांच्या नावांची नोंद नाही, अशा सर्व शेतकऱ्यांना रेकॉर्डवर आणण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यातील तब्बल २ लाख ३१ हजार शेतकऱ्यांचा 'ग्रीस्टॅक' मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असून, त्यांना कर्जमाफी आणि इतर शासकीय योजनांचा लाभ मिळणे सुलभ होणार आहे. यासंदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत.

मंत्रालयात महसूल मंत्र्यांच्या दालनात झालेल्या या बैठकीला मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे,



आमदार निलेश राणे, आमदार दीपक केसरकर, महसूल व सहकार व कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. राज्यामध्ये सध्या तब्बल २ लाख ३१ हजार शेतकऱ्यांचे 'ग्रीस्टॅक' निघत नसल्याची गंभीर बाब समोर आली होती. यामध्ये अनेक तांत्रिक अडचणी होत्या. राज्यात सुमारे ५० हजार शेतकरी मयत आहेत, ज्यांच्या नोंदी अद्ययावत नाहीत.१० हजार प्रकरणांमध्ये जमीन वडिलांच्या नावे असून, मुलाचे नाव अद्याप सातबारावर लागलेले नाही. शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या 'कबुलायतदार' जागांवर सरकारचे नाव लावण्यात आले आहे. परिणामी, अशा शेतकऱ्यांना पीककर्ज मिळत नाही आणि घेतलेल्या कर्जाला कर्जमाफीचा लाभही मिळत नाही. एकट्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात १ हजार २०७ शेतकऱ्यांचे 'फार्मर आयडी' अद्याप निघालेले नाहीत. तर राज्यातील ही संख्या २ लाख ३१ हजार आहे.

### २.३१ लाख शेतकऱ्यांच्या 'ॲग्रीस्टॅक'चा मार्ग मोकळा; सर्वांना कर्जमाफी आणि शासकीय योजनांचा मिळणार लाभ

या सर्व अडचणींची दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने पावले उचलली आहेत. जे शेतकरी आहेत, परंतु त्यांचे नाव सातबारा किंवा इतर अधिकारात नाही, अशा शेतकऱ्यांच्या जमिनीची सर्व कागदपत्रे गोळा करून सहकार विभागाकडे पाठविण्यात येतील. यासाठी एक स्वतंत्र फॉरमॅट तयार करून सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून १५ दिवसांत अहवाल मागविण्यात यावा, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. लवकरच जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेऊन याबाबतचे अंतिम आदेश निर्गमित केले जातील.

देवस्थान, इनाम आणि वतन जमिनींसाठी विशेष उपाययोजना

ज्या शेतकऱ्यांकडे देवस्थान, कबुलायतदार, इनाम किंवा वतन जमिनी आहेत, त्यांनाही सर्व शासकीय सुविधा मिळाव्यात या उद्देशाने एक विशेष फॉर्म तयार करण्यात येणार आहे. यामुळे भविष्यात या शेतकऱ्यांनाही 'ग्रीस्टॅक' काढण्यासाठी मोठी मदत होणार आहे. सहकार आयुक्तांनी स्पष्ट केले आहे की, पात्र शेतकऱ्यांची यादी लावण्यात आली असून, ज्यांचे ग्रीस्टॅक निघू शकत नाही, त्यांच्याकडून इतर पर्यायी कागदपत्रे घेऊन मार्ग काढण्यात येईल. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले की, राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा अचूक डेटा तयार करून सर्वांना अधिकृत रेकॉर्डवर आणले जाईल. जे खऱ्या अर्थाने शेतकरी आहेत, मात्र तांत्रिक अडचणींमुळे त्यांना कर्जमाफी मिळालेली नाही, अशा सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर विशेष प्रयत्न केले जातील.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जेन-झी पिढीला मोलाचा सल्ला

## शॉर्टकटचा मोह टाळा, मेहनत आणि संघर्षाचा मार्ग निवडा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सोशल मीडिया, रील्स आणि इन्फ्लुएन्सर्सच्या या आधुनिक युगात तरुणांनी क्षणिक यशाच्या मागे न धावता मेहनत व संघर्षाचा मार्ग निवडायला हवा, असा मोलाचा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'जेन-झी' पिढीला दिला आहे. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या 'ट्रायम्फ ऑफ द इंडियन रिपब्लिक: माय लाइफ, माय स्ट्रगल्स' या आत्मचरित्राच्या अनावरण सोहळ्यात पंतप्रधान बोलत होते.

दिल्लीत पार पडलेल्या या कार्यक्रमात तरुणांना मार्गदर्शन करताना पंतप्रधान म्हणाले की, तरुणांनी इतरांच्या संघर्षातून शिकले पाहिजे आणि अधिकाधिक आत्मचरित्रे वाचली पाहिजेत. आत्मचरित्रांमुळे एखाद्या विशिष्ट काळातील वास्तव त्या व्यक्तीच्या अनुभवातून जवळून समजून घेण्याची संधी मिळते.




माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचे जीवन हे स्पष्ट करते की, केवळ प्रामाणिक मेहनतीच्या बळावर व्यक्ती कोणत्याही अडचणींवर मात करून देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदापर्यंत पोहोचू शकते. त्यांचे जीवन हा भारतीय लोकशाहीचा अमूल्य वारसा असून नवीन पिढीसाठी तो मोठा प्रेरणास्रोत ठरेल, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. तरुणाईला मोलाचा संदेश देताना पंतप्रधान मोदींनी एक समर्पक उदाहरण दिले. अनेकदा लोक उड्डाणपुलाचा वापर न करता घाईघाईत रेल्वे ट्रॅक ओलांडतात. पण तिथली धोक्याची पाटी आपल्याला सतत आठवण करून देत असते की, शॉर्टकटमुळे तुमचे स्वतःचेच नुकसान होऊ शकते. त्यामुळे आयुष्यातही शॉर्टकटचा मोह पूर्णपणे टाळायला हवा आणि शाश्वत यशाचा मार्ग पत्करायचा असतो, असे त्यांनी स्पष्ट केले. दुसरीकडे, सध्या देशभरात सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलने व नीट पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर तरुणाईशी थेट संवाद साधण्यासाठी आणि त्यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यासाठी सरकार व पक्षाकडून डिजिटल रणनीतीवर भर दिला जात असल्याचेही राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. शेवटी, तरुणांनी वाचनाची सवय जोपासावी आणि संघर्षाच्या वाटेवर चालत शाश्वत यश मिळवावे, असे आवाहन पंतप्रधान मोदींनी केले.

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या सार्वजनिक कार्याचा गौरव करताना पंतप्रधान म्हणाले की, राष्ट्रपतीपद सोडल्यानंतरही त्यांनी विश्रांती घेतलेली नाही; ते आजही सार्वजनिक जीवनात अत्यंत सक्रिय आहेत. सध्या ते 'एक देश, एक निवडणूक' या अत्यंत महत्त्वपूर्ण आणि देशपातळीवरील उपक्रमावर काम करत असून, त्यांचा हा प्रयत्न भारतीय लोकशाहीला अधिक मजबूत करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## चलनात येणार १० आणि २० रुपयांच्या प्लास्टिक नोटा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




नवी दिल्ली : केंद्र सरकारने १० रुपये आणि २० रुपये मूल्याच्या प्रत्येकी एक अब्ज प्लास्टिक बँक नोटांना फील्ड ट्रायलसाठी व्यवहारात आणण्यास मंजुरी दिली आहे. वित्तमंत्री निर्मला सीतारमण यांनी राज्यसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, भारतीय रिझर्व्ह बँकेने यासाठी सरकारकडे हा प्रस्ताव पाठवला होता. ट्रायल यशस्वी झाल्यास या दोन्ही मूल्यांच्या पॉलिमर नोटा नियमितपणे जारी केल्या जाऊ शकतील. पॉलिमर नोटा कागदी नोटांच्या तुलनेत अधिक टिकाऊ मानल्या जातात आणि यामध्ये सुरक्षेशी संबंधित काही अतिरिक्त वैशिष्ट्येही समाविष्ट केली जाऊ शकतात.

ग्राहक मूल्य निर्देशांकाद्वारे मोजली जाणारी सरासरी किरकोळ महागाई २०२३-२४ मध्ये ५.४% होती, जी घटून २०२४-२५ मध्ये ४.६% आणि २०२५-२६ मध्ये २.१% वर आली. तथापि, २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत ती वाढून ३.९% झाली. असे असले तरी महागाईचा दर आरबीआयच्या ४ टक्क्यांच्या लक्ष्यापेक्षा खालीच राहिला असल्याचे दुसऱ्या एका प्रश्नाच्या उत्तरात वित्तमंत्र्यांनी सांगितले. जीएसटी परिषदेच्या ५६ व्या बैठकीत जीएसटी रचनेचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. या अंतर्गत मानक दर १८ टक्के, गुणवत्ता दर (मेरिट रेट) ५ टक्के आणि काही निवडक वस्तू व सेवांसाठी ४० टक्के असा विशेष डी-मेरिट दर ठेवण्यात आला आहे, असे आणखी एका प्रश्नाला उत्तर देताना वित्तमंत्री सीतारामण यांनी सांगितले

राज्यसभेत कम्युनिस्ट पक्षांविरोधात वित्तमंत्री निर्मला सीतारमण यांनी केलेल्या वक्तव्याचा भाग सभापती सी.पी. राधाकृष्णन यांनी मंगळवारी सभागृहाच्या कामकाजाच्या रेकॉर्डवरून हटवला. वित्तमंत्र्यांनी सोमवारी वरिष्ठ सभागृहात 'कर आकारणी आणि इतर कायदे (दुरुस्ती) विधेयक, २०२६' वरील चर्चेदरम्यान माकपा खासदार जॉन ब्रिटास यांच्यावर निशाणा साधताना कम्युनिस्टांबद्दल वक्तव्य केले होते. सरकार यूपीआय व्यवहारांवर शुल्क आकारणार असल्याचा दावा करून ब्रिटास यांनी खोटी माहिती पसरवली, असा आरोपही वित्तमंत्र्यांनी केला होता. कम्युनिस्टांविषयी वित्तमंत्र्यांनी केलेल्या वक्तव्यावर आक्षेप घेत भाकपा नेते पी. संदोष यांनी हे वक्तव्य कामकाजातून हटवण्याची मागणी केली होती. एखाद्या मंत्र्याचे वक्तव्य संसदेच्या रेकॉर्डवरून हटवले जाणे ही सामान्य बाब नाही.

# मंगळवेढ्यात म्हैसाळच्या पाच टीएमसी पाण्यासाठी सर्व्हेचे आदेश

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे निर्देश; आमदार समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा/प्रतिनिधी : म्हैसाळ उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील मंगळवेढा तालुक्यातील १९ गावांसाठी पाच टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याच्या मागणीवर आता लाभक्षेत्राचा सर्व्हे होणार आहे. जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी मंत्रालयात जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत आमदार समाधान आवताडे यांनी मंगळवेढ्याचा पाणीप्रश्न मांडल्यानंतर जलसंपदा विभागाचे सचिव एकनाथ डवले यांनी लाभक्षेत्राचा सर्व्हे करून आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे मंगळवेढ्याच्या दक्षिण भागातील शेतकऱ्यांना वाढीव पाणी मिळण्याच्या दृष्टीने प्रशासकीय कार्यवाहीला सुरुवात झाली आहे.



म्हैसाळ योजनेत मंगळवेढा तालुक्यातील १९ गावांसाठी १.२७ टीएमसी पाणी मंजूर आहे. मात्र, प्रत्यक्षात मंजूर पाण्याच्या दहा टक्के पाणीदेखील नियमितपणे मिळत नसल्याने लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. मंगळवेढा तालुका योजनेच्या टेल एंडला असल्याने कमी दाबाने आणि अत्यल्प प्रमाणात पाणी मिळत असल्याचा मुद्दा आमदार समाधान आवताडे यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिला.

या पार्श्वभूमीवर जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात ही महत्त्वपूर्ण बैठक झाली. मंगळवेढा तालुक्यातील १९ गावांसाठी सध्याचे १.२७ टीएमसी पाणी अपुरे आहे. या लाभक्षेत्रासाठी पाच टीएमसी पाण्याची आवश्यकता असल्याचे आमदार समाधान आवताडे यांनी बैठकीत स्पष्ट केले.

मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागातील प्रत्यक्ष लाभक्षेत्र, क्षेत्रफळ आणि पाण्याची गरज याचा सर्व्हे करण्याच्या सूचना सचिव एकनाथ डवले यांनी प्रशासनाला दिल्या. सर्व्हेनंतर संबंधित लाभक्षेत्राला पाच टीएमसीपर्यंत पाणी देण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही केली जाणार आहे. यामुळे मंगळवेढ्याच्या दक्षिण भागातील सिंचनाचा प्रश्न मार्गी लागण्याच्या दृष्टीने महत्त्वाची प्रशासकीय प्रक्रिया सुरू झाली आहे.

दरम्यान, म्हैसाळ योजनेवरील वितरिका क्रमांक १ व २ वरील गावांना पूर्ण क्षमतेने पाणी मिळावे, यासाठी बंदिस्त पाईपलाईन मंजूर करण्याची मागणीही आमदार आवताडे यांनी केली. बंदिस्त पाईपलाईनमुळे पाणी वितरणातील अडथळे दूर होऊन टेल एंडपर्यंत पाणी पोहोचण्यास मदत होणार आहे.

तसेच माण व भीमा नदीवरील बंधाऱ्यांची उंची वाढविण्याच्या कामास मंजुरी द्यावी. मंगळवेढा उपसा सिंचन योजनेच्या कामासाठी नाबार्डकडून वित्तपुरवठा मिळण्यास मंजुरी द्यावी, अशा मागण्याही त्यांनी बैठकीत केल्या.

मंगळवेढा तालुक्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे आणि पुरेसे पाणी मिळावे, यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले.

# आदर्श शिक्षक पुरस्कार बद्दल धनाजी साबळे सरांचा माजी विद्यार्थ्यांकडून येतोचित सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पटवर्धन कुरोली येथील तालुका पंढरपूर येथील पटवर्धन कुरोली प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे सहशिक्षक श्री धनाजी शंकर साबळे (सर) यांना सोलापूर जिल्हा माध्यमिक शाळा कृती समिती मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, पंढरपूर तालुका यांच्या वतीने प्रदान करण्यात येणारा आदर्श शिक्षकपुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा माजी विद्यार्थ्यांच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी माजी विद्यार्थ्यांनी साबळे सरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन येतोचित सन्मान करण्यात आला. तसेच त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याबद्दल अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. श्री धनाजी साबळे सर यांनी आपल्या अध्यापनाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना घडविले असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती सोबतच त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी सातत्याने मार्गदर्शन केले आहे व त्यांच्या कार्याची दखल घेत मिळालेल्या आदर्श शिक्षक पुरस्कारहा त्यांचा शैक्षणिक योगदानाचा गौरव असल्याची भावना माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. ज्या शिक्षकांनी आम्हाला घडविले त्यांनाच सन्मानित करण्याची संधी मिळणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे अशी भावना मावली जवळेकर यांनी व्यक्त केली. बळे सरांनी मिळालेल्या या सन्मानाबद्दल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी व माजी विद्यार्थी पालक तसेच ग्रामस्थांकडून अभिनंदन आता वर्षाव होत आहे.

यावेळी उपस्थित बळीराजा शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली जवळेकर ग्रामपंचायत सदस्य अनिल सावंत, युवा नेते गोपाळ पाटील, गणेश देशमुख असलम आतार, स्वप्निल राऊत, प्रशालेतील शिक्षक व शिक्षकेतर सर्व स्टाफ ही उपस्थित होते.

# अंधश्रद्धा : समाजाच्या प्रगतीतील अदृश्य अडथळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**(अंधश्रद्धेच्या अंधारातून विवेकाच्या प्रकाशाकडे)**

अंधश्रद्धा ही केवळ एखाद्या व्यक्तीची चुकीची समजूत नसून ती समाजाच्या प्रगतीसमोरील एक गंभीर अडथळा आहे. श्रद्धा ही माणसाला मानसिक आधार देऊ शकते; परंतु जेव्हा श्रद्धेच्या नावाखाली विवेक, तर्क आणि वैज्ञानिक दृष्टिकोन बाजूला सारला जातो, तेव्हा तिचे रूप अंधश्रद्धेत बदलते. अंधश्रद्धेमुळे माणूस भीती, अज्ञान आणि चुकीच्या समजुतींच्या जाळ्यात अडकतो.

आपल्या समाजात आजही ग्रहणाच्या वेळी अन्न खाऊ नये, विशिष्ट दिवशी घराबाहेर पडू नये, आजारपणाचे कारण भूतबाधा आहे, एखाद्या व्यक्तीवर करणी झाली आहे, मांत्रिकाच्या उपचाराने गंभीर आजार बरा होतो, अशा अनेक समजुती आढळतात. काही वेळा या अंधश्रद्धांचा आर्थिक आणि मानसिक फायदा घेऊन भोंदू बाबा, मांत्रिक आणि तथाकथित साधू सामान्य माणसांची फसवणूक करतात. दुर्दैवाने अशा प्रकारांमध्ये महिलांना, मुलांना आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना अधिक त्रास सहन करावा लागतो.

सर्वात मोठा आधार म्हणजे भीती आणि अज्ञान. एखाद्या घटनेमागील वैज्ञानिक कारण समजले नाही की माणूस त्याचा संबंध चमत्कार, दैवी शक्ती किंवा अदृश्य शक्तींशी जोडतो. परंतु विज्ञान प्रश्न विचारायला शिकवते. 'हे का घडले?', 'यामागे कारण काय?', 'याचा पुरावा काय?' असे प्रश्न विचारण्याची सवय लागली की अंधश्रद्धेची पकड आपोआप कमी होते.

महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला शिक्षण, समता आणि विवेकाचा मार्ग दाखवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी माणसाने बुद्धीचा आणि तर्काचा वापर करावा, असा मूलभूत विचार समाजासमोर ठेवला. त्यांचा संदेश केवळ शिक्षण घेण्यापुरता मर्यादित नव्हता; तर शिक्षणातून माणसाने विचारशील आणि विवेकनिष्ठ बनावे, हा त्यामागचा व्यापक हेतू होता.


अंधश्रद्धा निर्मूलन म्हणजे श्रद्धेचा अपमान करणे नव्हे. प्रत्येक व्यक्तीला आपल्या श्रद्धा आणि धार्मिक भावना जपण्याचा अधिकार आहे. मात्र श्रद्धेच्या नावाखाली फसवणूक, हिंसा, शोषण, मानवी प्रतिष्ठेचा अपमान किंवा जीविताला धोका निर्माण होत असेल, तर त्याला विरोध करणे आवश्यक आहे. श्रद्धा असावी, पण तिच्यासोबत विवेकही असावा. आजच्या डिजिटल युगात अंधश्रद्धा केवळ गावागावांत किंवा प्रत्यक्ष व्यवहारात दिसत नाही; ती सोशल मीडिया, व्हॉट्सअॅप, यूट्यूब आणि इतर माध्यमांतूनही वेगाने पसरते. एखादा चमत्काराचा व्हिडिओ, खोटा वैद्यकीय दावा किंवा बनावट संदेश हजारो लोकांपर्यंत काही क्षणांत पोहोचतो. त्यामुळे डिजिटल साक्षरतेसोबत वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

अंधश्रद्धेविरुद्धची खरी लढाई ही व्यक्तीविरुद्ध नसून अज्ञान, भीती आणि अविवेकी विचारांविरुद्धची लढाई आहे. मुलांना लहानपणापासून प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन देणे, प्रयोगातून विज्ञान शिकवणे, खोट्या दाव्यांची पडताळणी करणे आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे ही प्रत्येक सुजाण नागरिकाची जबाबदारी आहे.

खरी प्रगती मोठमोठ्या इमारती, रस्ते आणि तंत्रज्ञानामुळे होत नाही; तर माणसाच्या विचारांमध्ये परिवर्तन झाल्यावर होते. ज्या समाजात प्रश्न विचारणारा नागरिक, पुराव्यावर विश्वास ठेवणारा विद्यार्थी आणि विवेकाने निर्णय घेणारा तरुण निर्माण होतो, तो समाज अंधश्रद्धेच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे वाटचाल करतो. म्हणूनच आजची गरज आहे अंधश्रद्धेला विरोध, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार आणि विवेकाला जीवनाचा आधार. कारण समाजाला चमत्कारांची नव्हे, तर विचार करणाऱ्या माणसांची गरज आहे.

**– डॉ शहाजी चंदनशिवे**
**राज्य समन्वयक फुले–आंबेडकर विद्वत सभा महाराष्ट्र राज्य**

# गहिनीनाथ महाराज औसेकर यांना 'विठ्ठल सेवा पुरस्कार'



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांना त्यांच्या दीर्घकालीन आध्यात्मिक, धार्मिक, सामाजिक, वारकरी सेवा तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या सेवाकार्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'विठ्ठल सेवा पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात येणार आहे.

अखिल भारतीय वीरशैव लिंगायत महासभा (रजि.), महाराष्ट्र राज्य शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष 'ऋश-श्रळलळींरींळेप उशीशोपू' मध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. हा सन्मान सोहळा दि. १६ ऑगस्ट रोजी सकाळी ११.०० वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर (ध. इ. उहर्रींरप उशपींशी), नरिमन पॉईंट, मंत्रालयासमोर, मुंबई येथे संपन्न होणार आहे. या सोहळ्यास कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, कर्नाटकचे ग्रामीण विकास व पंचायत राज मंत्री तथा अखिल भारतीय वीरशैव लिंगायत महासभेचे अध्यक्ष ईश्वर खांड्रे, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कर्नाटक विधान परिषदेचे सभापती बसवराज होरट्टी तसेच महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

### मंदिर सेवा व भाविकांच्या सुविधांसाठी योगदान

गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या माध्यमातून मंदिर संवर्धन, भाविकांना सुलभ दर्शन, यात्रा नियोजन, स्वच्छता, सुरक्षा, आरोग्य सुविधा, निवास व्यवस्था आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भाविक सेवा अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने योगदान दिले आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या जतन व संवर्धनाच्या कामाला गती देणे, मंदिराच्या ऐतिहासिक व धार्मिक वास्तूचे जतन करणे, मोठ्या यात्रांमध्ये लाखो भाविकांसाठी नियोजनबद्ध सुविधा उपलब्ध करून देणे, दर्शन व्यवस्था अधिक सुलभ करणे तसेच वारकरी व भाविकांच्या सोयीसाठी विविध सुविधा निर्माण करण्याच्या प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. आषाढी, कार्तिकी यांसह विविध यात्रांच्या काळात दर्शन व्यवस्था, भाविकांच्या निवास व भोजनाची व्यवस्था, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, सुरक्षा व्यवस्था, दर्शन रांग व्यवस्थापन आणि महिला भाविकांसाठी आवश्यक सुविधा याबाबत मंदिर समितीच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या नियोजनात त्यांचे मार्गदर्शन राहिले आहे. तसेच वारकरी परंपरा, संत साहित्य, कीर्तन आणि समाजप्रबोधनाच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता व व्यसनमुक्तीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या कार्यालाही त्यांनी प्रोत्साहन दिले आहे.

### यापूर्वीही विविध पुरस्कारांनी गौरव

गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या कार्याची यापूर्वीही विविध स्तरांवर दखल घेण्यात आली आहे. त्यांना 'महाराष्ट्ररत्न पुरस्कार', 'शनिरत्न पुरस्कार' तसेच 'मानवसेवा जीवनगौरव राज्यस्तरीय पुरस्कार' अशा विविध ३० ते ३२ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने कीर्तन/समाजप्रबोधन क्षेत्रातील पुरस्कारासाठीही त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली आहे. धार्मिक व आध्यात्मिक कार्यासोबतच वारकरी संप्रदायाची परंपरा, कीर्तन-प्रवचनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन आणि मानवसेवा या क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांना विविध सन्मान प्राप्त झाले आहेत.

### पंढरपूरच्या आध्यात्मिक परंपरेचा गौरव

'विठ्ठल सेवा पुरस्कार' हा गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या वैयक्तिक कार्याचा गौरव असला, तरी त्यामागे पंढरपूरची समृद्ध वारकरी परंपरा, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराची सेवा आणि लाखो वारकरी भाविकांच्या श्रद्धेचा सन्मान दडलेला आहे. त्यांच्या या सन्मानामुळे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत राष्ट्रीय स्तरावरील संस्थेने केलेला हा गौरव पंढरपूरसह महाराष्ट्रातील वारकरी व भक्त परिवारासाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे.

# शैलेश दोंदे यांच्या सेवापूर्तीनिमित्त 'सामाजिक कृतज्ञता सोहळा' उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : समता संघर्ष संघटन आणि समता संघर्ष सांस्कृतिक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने भिवंडी महानगरपालिकेचे उपायुक्त तसेच समता संघर्ष संघटनचे अध्यक्ष शैलेश दोंदे यांच्या सेवापूर्तीनिमित्त 'सामाजिक कृतज्ञता सोहळ्याचे' आयोजन शनिवारी (दि. ८ ऑगस्ट) कल्याण येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथे करण्यात आले.



कार्यक्रमाच्या पहिल्या सत्राच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत सुरेश सावंत होते. 'प्रशासकीय सेवा आणि आंबेडकरी जाणीवा' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनीही आंबेडकरी चळवळीच्या विविध विषयांवर आपली मते व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार मिलिंद जाधव यांनी केले, तर कवयित्री सुरेखा पेठणे यांनी सूत्रसंचालन केले.

दुसऱ्या सत्रात 'ऋशाप न आंदोलन आणि आंबेडकरी तत्त्वज्ञान' या विषयावर विचारमंथन करण्यात आले. ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत श्यामदादा गायकवाड, ज्येष्ठ आंबेडकरी साहित्यिका प्रा. आशालता कांडबळे, ज्येष्ठ आंबेडकरी साहित्यिक डॉ. विठ्ठल शिंदे तसेच विद्यार्थी आंदोलक रोहित ठाले यांनी मार्गदर्शन केले. या सत्राचे सूत्रसंचालन इंजी. रोहित जाधव यांनी केले, तर कवी अक्षय भोईर यांनी आभार मानले. शैलेश दोंदे यांनी प्रशासकीय सेवेत कार्यरत असताना सामाजिक बांधिलकी जपत फुले-शाहू-आंबेडकर विचारांची जपणूक करण्यासाठी केलेल्या कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला. त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त आयोजित हा सोहळा केवळ सत्कारापुरता मर्यादित न राहता सामाजिक कृतज्ञता, वैचारिक संवाद आणि नव्या पिढीला आंबेडकरी विचारांशी जोडण्याचा उपक्रम ठरला. समता संघर्ष संघटन आणि समता संघर्ष सांस्कृतिक मंच यांच्या वतीने शैलेश दोंदे यांना मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी अँड किरण चन्ने, सदानंद गायकवाड, श्रीकांत कांबळे, अविनाश दोंदे, गणेश सोष्टे, संजय ईदे तर कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, आंबेडकरी विचारवंत, साहित्यिक, विद्यार्थी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला.

**प्लेसमेंटद्वारे नोकरीच्या तब्बल ४७३ पेक्षा जास्त संधी**

# स्वेरीच्या ७ विद्यार्थ्यांची दोन आंतरराष्ट्रीय कंपन्यामध्ये निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूरः 'मेपकॉन डिझाईन स्टुडीओ पुणे' व 'डायनेक्स इमिशन सोल्युशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' या दोन भारतीय बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपन्यांनी घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) मधील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरींग या विभागातील ७ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

**स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना शै. वर्ष २०२५-२०२६ मध्ये प्लेसमेंटद्वारे नोकरीच्या तब्बल ४७३ पेक्षा जास्त संधी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. अजूनही कांही कंपन्यांचे रिझल्ट्स येणे बाकी आहे. विद्यार्थ्यांची चिकाटी, स्वेरीची आदरयुक्त शिक्षणसंस्कृती, रात्र अभ्यासिका, विद्यार्थ्यांना दिले जाणारे विविध प्रकारचे प्रशिक्षण आदी बाबींचा एकत्रित परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये होणारी निवड होय.**

'मेपकॉन डिझाईन स्टुडीओ, पुणे' व 'डायनेक्स इमिशन सोल्युशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' या दोन बहुराष्ट्रीय दर्जाच्या भारतीय कंपन्यांच्या निवड समित्यांनी गोपाळपूर येथील इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून 'मेपकॉन डिझाईन स्टुडीओ पुणे' या कंपनीत विनोद आप्पासाहेब गाजरे व अथर्व आनंद शिंदे या दोन विद्यार्थ्यांची तर 'डायनेक्स इमिशन सोल्युशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीत अमित अशोक कोळी, वेदांत विजय पाटील, वसिम ईलाही मुलाणी, अभिषेक आगतराव पवार व लक्ष्मण नागनाथ पांढे हे ५ विद्यार्थी असे मिळून दोन्ही कंपन्यांनी एकूण ७ विद्यार्थ्यांची निवड केली. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधून प्लेसमेंटच्या माध्यमातून आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी देण्यात आल्या आहेत. यात डायनेक्स इमिशन सोल्युशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीकडून प्रत्येकी प्रती वर्ष ३.६ लाखांचे तर 'मेपकॉन डिझाईन स्टुडीओ, पुणे' या कंपनीकडून प्रत्येकी ३ लाखांचे पॅकेज देण्यात आले आहे.

स्वेरीचे विद्यार्थी आज विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यात आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. 'स्वेरी' मधून विविध कंपन्यात प्लेस होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे सध्याच्या आकडेवारीवरून दिसून येते. विद्यार्थ्यांना ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागामार्फत स्वतंत्रपणे कुशल प्रशिक्षकांद्वारे एप्टीट्युड, कम्युनिकेशन स्कील, टेक्निकल स्कील, विविध सॉफ्टवेअर्स, मॉक इंटरव्युव्ह यांचे प्रशिक्षण दिले जाते.

स्वेरीमध्ये वार्षिक परीक्षांचे उत्कृष्ट निकाल, संशोधने, मानांकने, इन्फ्रास्ट्रक्चर याबरोबरच विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून करिअरच्या दृष्टीने सर्वात महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या प्लेसमेंटकडे देखील अधिक लक्ष दिले जाते व मोठमोठ्या कंपन्यांना हवे तसे प्रशिक्षणार्थी विद्यार्थी घडविण्यासाठी प्रशिक्षित तज्ञांकडून उत्कृष्ट मार्गदर्शन केले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट व संबंधित विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी दोन्ही कंपन्यात निवड झालेल्या सातही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# अक्कलकोट बबलाद शाळेत स्लॅब नव्हे तर प्लास्टर पडले; मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांचे स्पष्टीकरण

## बबलाद शाळेतील घटनेत सर्व विद्यार्थी शिक्षक सुखरूप; जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समितीचे सभापती इंद्रजीत पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांचे स्पष्टीकरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील बबलाद येथील कन्नड प्राथमिक शाळेत घडलेल्या घटनेत कोणत्याही विद्यार्थ्याला गंभीर दुखापत झालेली नसून, सर्व विद्यार्थी व शिक्षकांची प्रकृती स्थिर आहे. घटनेची माहिती मिळताच

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, अक्कलकोटचे गटविकास अधिकारी यांनी स्वतः बबलाद येथील शाळेत घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यांनी शाळेची परिस्थिती, छतावरील प्लास्टरची पाहणी तसेच जखमी विद्यार्थी व शिक्षकांच्या प्रकृतीची माहिती घेतली. त्यानंतर जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य आणि उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समितीचे सभापती इंद्रजीत पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित पत्रकार परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी घटनेची वस्तुस्थिती स्पष्ट केली.



जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने दखल घेत आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्याने सर्व जखमींना उपचारानंतर सुरक्षितपणे घरी सोडण्यात आले.

सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी याबाबत स्पष्टीकरण देताना सांगितले की, शाळेत स्लॅब कोसळल्याची प्राथमिक माहिती समोर आली होती. मात्र प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर स्लॅब कोसळलेला नसून छतावरील प्लास्टरचा काही भाग खाली पडल्याचे स्पष्ट झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काल दुपारी १२ ते १ वाजण्याच्या सुमारास शाळेतील विद्यार्थी खेळत असताना छताच्या हुकला साडीची दोरी बांधून झोका तयार करण्यात आला होता. त्यावेळी दोरीला ताण आल्याने छतावरील प्लास्टरचा काही भाग खाली पडला. या घटनेत १३ विद्यार्थी व २ शिक्षक किरकोळ जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच गट विकास अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांनी तत्काळ रुग्णवाहिकेची व्यवस्था करून जखमींना रुग्णालयात दाखल केले. सर्वांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. बहुतांश जखमींना प्राथमिक उपचारानंतर तातडीने घरी सोडण्यात आले. एका विद्यार्थ्याला उलट्या होत असल्याने खबरदारी म्हणून सीटी स्कॅन करण्यात आला. त्याचा अहवाल सामान्य आल्यानंतर त्यालाही डिस्चार्ज देण्यात आला. एका विद्यार्थ्याच्या पायाला किरकोळ दुखापत झाल्याने ड्रेसिंग करून त्यालाही घरी सोडण्यात आले.

सध्या एकही विद्यार्थी किंवा शिक्षक रुग्णालयात उपचार घेत नसून सर्वांची प्रकृती स्थिर आहे. त्यामुळे पालकांनी घाबरून जाऊ नये, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, शाळेची इमारत धोकादायक नसल्याचेही सीईओ कुशल जैन यांनी स्पष्ट केले. या शाळेत एकूण १० खोल्या असून, शाळा व्यवस्थापन समितीकडूनही इमारत धोकादायक असल्याबाबत कोणताही अहवाल देण्यात आलेला नव्हता.

मात्र, विद्यार्थ्यांनी छताच्या हुकला साडीची दोरी बांधून झोका खेळणे आणि त्यावर आवश्यक देखरेख न राहणे ही बाब प्रशासनाने गांभीर्याने घेतली आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी संबंधितांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. याप्रकरणी मुख्याध्यापक व गटशिक्षणाधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, संबंधित शिक्षकांच्या भूमिकेचीही चौकशी करून नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही केली जाणार आहे.

सध्या एकही विद्यार्थी किंवा शिक्षक रुग्णालयात उपचार घेत नसून सर्वांची प्रकृती उत्तम व स्थिर आहे, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी पत्रकार परिषदेत दिली.



# शाळेचे छत कोसळून १३ विद्यार्थी जखमी : दोषींवर गुन्हे दाखल करा; वंचित बहुजन आघाडीची सोलापूर जिल्हा परिषदेकडे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : अक्कलकोट तालुक्यातील मौजे बबलाद येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेचे छत कोसळून १३ विद्यार्थी आणि दोन शिक्षक जखमी झाल्याच्या घटनेप्रकरणी संबंधित अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार आणि मुख्याध्यापकांवर गुन्हे दाखल करून सखोल चौकशी करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या सोलापूर जिल्हा शाखेच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.




११ ऑगस्ट रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास प्रार्थना संपल्यानंतर विद्यार्थी वर्गात जात असताना शाळेचे छत अचानक कोसळले. या दुर्घटनेत १३ विद्यार्थी आणि दोन शिक्षक जखमी झाले. या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असे वंचित बहुजन आघाडीने सांगितले.

या दुर्घटनेला जबाबदार असणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार आणि मुख्याध्यापकांवर गुन्हे दाखल करून त्याचा अहवाल देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच जिल्हा परिषदेकडून शाळांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी आतापर्यंत किती निधी उपलब्ध झाला आणि कोणत्या शाळांवर किती निधी खर्च करण्यात आला, याची माहिती देण्याची मागणी करण्यात आली.

सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांची एकूण संख्या, शिक्षक संख्या आणि विद्यार्थी पटसंख्या याबाबतचा अहवालही मागण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून धोकादायक इमारतींची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहे आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, तसेच शाळांना देण्यात आलेल्या विविध सुविधांचा अहवाल सादर करावा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे.

निवेदन देताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनेकर यांच्या कथित उद्धट बोलण्यावरून वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये आणि अधिकाऱ्यांमध्ये जोरदार शाब्दिक वाद झाला. त्यामुळे काही काळ जिल्हा परिषद परिसरातील वातावरण तणावपूर्ण झाले होते.

यावेळी जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडी खांबे, प्रशांत गोळेवार, युवक शहराध्यक्ष महेश जाधव, युवक शहर सचिव नरेंद्र शिंदे, शहर महासचिव विनोद इंगळे, सुहास सावंत, शाहिद शेख, शरीफ शेख, अक्कलकोट तालुकाध्यक्ष विशाल ठोंबरे, दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष सुरेश देशमुख, विजय गायकवाड, विजयानंद उघडे, श्रीनिवास संगेपान आदी पदाधिकारी उपस्थित होते. शाळांच्या सुरक्षेबाबत तातडीने ठोस उपाययोजना न केल्यास वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

# औसा तालुक्यातील सारणी ग्रामपंचायतला वाली कोण? ग्रामसेवकाविना कामे खोळंबली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील व लातूर जिल्ह्यातील शेवटचे टोक सारणी गाव.

सारणी गावांमध्ये गेल्या १५ ते २० दिवसापासून ग्रामसेवक चार्ज घेऊन रुजू होण्यास तयारच नाहीत

**सध्या पावसाळा असून गावामध्ये पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे गावात पाण्याची सुविधा भरपूर आहे पाणी हे विकत घेऊन भगवावे लागत आहे त्या मुळे आमच्या गावचा पाण्याचा प्रश्न मिटेल का व गावाला एक चांगला ग्रामसेवक देऊन आमच्या गावचा प्रश्न मिटेल का**
**– नागरिक**
**परमेश्वर विलास बिराजदार**

**सध्या गावाला ग्रामसेवक नाही त्यामुळे गावातील कामे होत नाही सारणी गावासाठी ग्रामसेवक देऊन गावातील अडिअडचणी सुटतील का असा प्रश्न पडला आहे**
**– नागरिक**
**धोंडीराम हवालदार**

दिनांक २४/ ७/ २०२६ पासून शंके ग्रामसेवक ५६ दिवसाच्या रजेवर गेलेले आहेत. तेव्हापासून आजपर्यंत कोणताही ग्रामसेवक सारणी गावासाठी येण्यासाठी तयार नाहीत

ग्रामसेवक नसल्यामुळे गावांमध्ये नागरिकांची हेळसांड होत आहे

गट विकास अधिकारी यांनी रजा तर दिली पण त्यांना पुन्हा गावासाठी ग्रामसेवक देण्याचा विसर पडला की काय

असा प्रश्न गावातील नागरिकांना पडला आहे सारणी गावाला रुजू होण्याची अडचण काय,,?

गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली असा संदेश जाताना दिसत आहे.

ग्रामसेवक रुजू न होण्याचं कारण तर, दाल मे कुछ काला तो नहीं है, असा तर नाही ना.

पहिले सारणी गाव हे विकासापासून वंचित आहे सध्याची परिस्थिती ही

साहेब सारणी गावाला ग्रामसेवक देता का ग्रामसेवक' अशी अवस्था झाली आहे गेल्या तीन चार वर्षापासून ग्रामसभा झाली नाही

आता १५ ऑगस्ट च्या ग्रामसभेला प्रशासनाची उदासीनता दिसून येत आहे. १५ ऑगस्ट पर्यंत तरी ग्रामसेवक येतील का व ग्रामसभा घेऊन नागरिकांच्या समस्या सुटतील का असा प्रश्न गावातील नागरिकांना पडला आहे

**आतापर्यंत आलेले ग्रामसेवक हे महिन्यात एकदा ते दोनदा च येत होते त्यामुळे आमच्या गावातील समस्या हे कागदावर च झाल्या असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे एक चांगला ग्रामसेवक देऊन आमच्या अडचणी सुटतील का असा प्रश्न पडला आहे**
**– नागरिक**
**नाना पाटील (आर्मी )**

या सर्व समस्यावर वरिष्ठ अधिकारी काय भूमिका घेतील व गावाला ग्रामसेवक देतील का असा गावातील नागरिकांना प्रश्न पडला आहे.

**बोंडगांव देवी - खांबी मार्गावरील पुलाचे तातडीने नूतनीकरण करून एसटी वाहतूक पूर्ववत करण्याची प्रवासी व ग्रामस्थांची मागणी**

# जीर्ण पुलामुळे एसटी वाहतूक बंद; शाळकरी विद्यार्थी व वृद्धांना मनस्ताप, आर्थिक भूर्दंड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी : अर्जुनी मोरगाव तालुक्यातील खांबी हे परिसरातील प्रमुख व महत्त्वाचे गाव असून बोंडगांव देवी - खांबी मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. मात्र या मार्गाच्या मध्यभागी असलेल्या जुन्या व जीर्ण पुलाची अवस्था धोकादायक झाल्याने एसटी महामंडळाच्या साकोली आगाराची बससेवा मागील ४ महिन्यांपासून बंद करण्यात आली आहे. त्यामुळे खांबीसह परिसरातील गावांमधील शाळकरी विद्यार्थी, वृद्ध, महिला तसेच सर्वसामान्य प्रवाशांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत असून खासगी वाहनांचा वापर करावा लागत असल्याने आर्थिक भूर्दंडही सहन करावा लागत आहे.





बोंडगांव देवी हे जिल्हा परिषद क्षेत्रातील महत्त्वाचे गाव असून येथे महसूल मंडळ कार्यालय, शाळा, महाविद्यालय, बँक, दवाखाना, कृषी केंद्र, संगणकीय सुविधा केंद्र तसेच विविध प्रकारची दुकाने आहेत. याशिवाय पूर्व विदर्भात प्रसिद्ध असलेले माँ गंगा-जमुना देवस्थानही या परिसरात आहे. महाशिवरात्रीच्या काळात प्रतापगड यात्रेसाठी ये-जा करणाऱ्या भाविकांचीही या मार्गावर मोठी वर्दळ असते. साकोली, भंडारा, नागपूर ला ये-जा करण्यासाठी कुंभीटोला, बाराभाटी, येरंडी, ब्राम्हणटोला, चापटी, पिंपळगाव, खांबी, बोंडगांव देवी या मार्गांवरील प्रवाशांसाठी हा मार्ग मुख्य आणि महत्त्वाचा असल्याने पुलाची समस्या तातडीने सोडविण्याची गरज आहे.

### ३५ वर्षांपूर्वी बांधलेला पूल धोकादायक

बोंडगांव देवी - खांबी मार्गाच्या मध्यभागी नाला असून त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून सुमारे ३५ वर्षांपूर्वी पुलाचे बांधकाम करण्यात आले होते. त्यावेळी हा पूल कमी उंचीचा बांधण्यात आला. त्यानंतर नाल्यातील गाळाचा नियमित उपसा न झाल्याने तसेच रस्त्याचे वेळोवेळी डांबरीकरण व दुरुस्ती होत गेल्याने रस्त्याची उंची वाढत गेली. परिणामी पुलाची उंची तुलनेने कमी होत गेली.

पावसाळ्यात मुसळधार पाऊस झाल्यास नाल्यातील पाण्याची पातळी वाढून पाणी पुलावरून वाहते. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक वारंवार विस्कळीत होते. आता तर पुलाच्या खालच्या भागातील लोखंडी सळाखी दिसू लागल्याने पुलाची अवस्था अत्यंत गंभीर झाली आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून एसटी वाहतूक बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### एसटी बंद झाल्याने विद्यार्थ्यांसह वृद्धांची गैरसोय

बोंडगांव देवी - खांबी तसेच निमगाव - खांबी मार्गावरून साकोली आगाराच्या एसटी बसेस खांबी मार्गे अर्जुनी मोरगाव व साकोलीकडे ये-जा करतात. मात्र पुलाच्या जीर्ण अवस्थेमुळे मागील ४ महिन्यापासून बसफेऱ्या बंद झाल्याने खांबी बसस्थानकावर कुंभीटोला, बाराभाटी, ब्राम्हणटोला, पिंपळगाव, इंजोरी, चापटी, सावरटोला, बोरटोला आणि खांबी परिसरातून येणाऱ्या प्रवाशांसमोर मोठी अडचण निर्माण झाली आहे.

एसटी सेवा ही ग्रामीण भागातील नागरिकांसाठी स्वस्त व सुरक्षित वाहतुकीचे महत्त्वाचे साधन आहे. मात्र बससेवा बंद असल्याने प्रवाशांना नाईलाजाने खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. विशेषतः शाळा-महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांसह वृद्ध नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. रोजच्या प्रवासासाठी अधिक पैसे मोजावे लागत असल्याने सर्वसामान्य कुटुंबांवर आर्थिक भार पडत आहे.

### जड वाहनांची वर्दळ सुरू, मग एसटीच का बंद?

या मार्गावर सध्या खासगी वाहने तसेच जड वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ सुरू असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. पुलाची अवस्था धोकादायक असल्यामुळे एसटी बससेवा बंद करण्यात आली असली तरी इतर वाहनांची वाहतूक सुरू असल्याने सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने पुलाची तातडीने पाहणी करून योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

### पुलाचे नूतनीकरण करून बसफेऱ्या सुरू करण्याची मागणी

बोंडगांव देवी - खांबी मार्गावरील या पुलाच्या समस्येकडे लोकप्रतिनिधी व संबंधित विभागाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने पुलाच्या नूतनीकरणासाठी निधी व प्रशासकीय मंजुरी द्यावी. पुलाचे मजबूत व उंचीचे नव्याने बांधकाम करून पावसाळ्यातील वाहतुकीची समस्या कायम स्वरूपी दूर करावी. तसेच पुलाचे काम पूर्ण होईपर्यंत प्रवाशांच्या सुरक्षिततेचा विचार करून योग्य पर्यायी व्यवस्था करावी आणि काम पूर्ण झाल्यानंतर साकोली आगाराच्या एसटी बसफेऱ्या पूर्ववत सुरू कराव्यात, अशी जोरदार मागणी खांबी ग्रामस्थ व परिसरातील प्रवाशांकडून करण्यात येत आहे.